## निशाणी क्र.५५ वरील आदेश

वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ मयत झाले असल्याने त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्यामध्ये सामील करण्यास झालेला विलंब माफ करण्याकरीता व यदाकदाचित पारीत करण्यात आलेला अबेटमेंटचा आदेश रद्द होण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. वादीतर्फे अर्जात असे नमुद करण्यात आले की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक हे दिनांक ०१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत व विशिष्ट मुदतीमध्ये त्यांचे वारस प्रकरणात रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते, परंतु मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या सर्व वारसांची नावे व पत्ते उपलब्ध न झाल्यामुळे प्रकरणात त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झालेला आहे, वादीने सदरचा विलंब जाणुनबुजून केलेला नाही, प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास झालेला विलंब क्षमापीत करून प्रकरण अबेटमेंट सेटेसाईड करून वारस अभिलेखावर घेण्यासाठी परवानगी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

०३. प्रतिवादीतर्फे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविणेत आलेला आहे. प्रतिवादीतर्फे असे नमुद करण्यात आले की, वादी व प्रतिवादी हे एकाच गावात राहत असुन त्यांची घरे देखील शेजारी आहेत, प्रतिवादी क्र. १ हे मयत झाल्याची समज वादींना असतानाही वादींनी वारस अभिलेखावर घेणेचा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे, वारस अभिलेखावर घेणेची मुदत संपली असुन सदर प्रकरण अबेट करणे न्यायाचे आहे, सबब अर्ज नामंजुर करून वादीवर खर्च आकारण्यात यावा अशी विनंती करण्यात आलेली आहे

०४. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ ***श्री.एस.एल. घोगरे*** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे विद्वान विधिज्ञ ***श्री.एल.एस. देशपांडे*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत दावा हा मालकी जाहीर होउन निरंतर मनाई हुकुम मिळणेकरीता व ठरावाकरीता दाखल करण्यात आलेला आहे. एकंदरीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील वाद विचारात घेता मयत प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी यांचेविरुध्द दावा पुढे चालविणेचा हक्क अबाधित राहतो. तेव्हा अशा परिस्थितीत दाव्यात योग्यप्रकारे, परिणामकारक निर्णय होण्याकरीता मयत प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे. वादीतर्फे प्रामुख्याने प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक हे दिनांक ०१/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत, परंतु विशिष्ट मुदतीमध्ये मयत प्रतिवादी यांच्या सर्व वारसांची नावे व पत्ते उपलब्ध न झाल्यामुळे विहित मुदतीत मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेता आलेले नाहीत वादीने सदरचा विलंब जाणुनबुजून केलेला नसून वरील कारणामुळे विलंब झालेला आहे असे शपथेवर नमुद करण्यात आलेले आहे. एकंदरीत झालेला विलंब विचारात घेता नमूद कारण समर्थनीय नाही किंवा सदर कारणाच्या पुष्टयार्थ अभिलेखावर कसलाही पुरावा नाही. परंतु दाव्याचे स्वरुप, वादी व प्रतिवादीमधील वादाचे स्वरुप, दावा स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्याची बाब, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम १,२ व ४ अन्वये प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुध्द दावा पुढे चालविणेचा हक्क अबाधित राहत असल्याची बाब विचारात घेता प्रस्तुत प्रकरणात मयत प्रतिवादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणे न्याययोग्य दिसून येते.

०६. दाव्याचे स्वरुप विचारात घेता अशाप्रकारचे प्रस्तुत अर्ज उदारतेने विचारात घेवुन झालेला विलंब उदारतेने माफ करणे आवश्यक आहे. फारफारतर झालेल्या विलंबाबाबत वादीवर खर्च लावून अर्ज मंजूर करणे न्याययोग्य असेल, जेणेकरुन कोणावरही अन्याय होणार नाही व मुख्य पक्षकारांमधील वाद गुणदोषावर निर्णयीत होण्याचा हेतू साध्य होईल. सबब प्रस्तुत प्रकरणात न्यायहेतूने प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्याययोग्य आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१) निशाणी क्र. ५५ वरील अर्ज रक्कम रु.५००/– (पाचशे रुपये) खर्चावर मंजूर करणेत येतो. वादीनी खर्च रक्कम पुढील तारखेस किंवा तत्पूर्वी प्रतिवादींना द्यावी.

२) खर्च रक्कम जमा केल्यानंतर/दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ श्रीहरी शिवदास आदनाक यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्याचे कामी समाविष्ट करण्यास झालेला विलंब माफ समजण्यात येईल व यदाकदाचित पारीत करण्यात आलेला अबेटमेंट चा आदेश रद्द समजण्यात येईल.

"**दावा येणेप्रमाणे पुढे चालेल.**"

सही /–
(एम.बी.सोनटक्के),
३रे दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई.

दिनांक –२४/०७/२०२५.